# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. २५ /२०२६

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०८(१)(च) मधील तरतुदीनुसार महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांमधील अध्यापक व अध्यापकेतर कर्मचाऱ्यांची संख्या, अर्हता, सेवेच्या अटी व शर्ती तसेच वित्तलब्धी या विद्यापीठाने व राज्य शासनाने निर्देशित केल्याप्रमाणे असणे,. तसेच अध्यापन, अभ्यास पाठयक्रम, प्रशिक्षण व संशोधन यांच्याकरीता कार्यक्षमतेने योग्य ती तरतूद करण्यास पुरेशा असणे आवश्यक असूनही संलग्नीकरणाची अट असून संलग्नीकरणाच्या अटींचे काटेकोरपणे पालन करणे संबंधित महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थांना बंधनकारक आहे.

तसेच मा. विद्यापरिषदेच्या दि. २४ जानेवारी, २०२६ रोजीच्या सभेमध्ये पारित केलेल्या ठराव क्र. वि.प.अ. १५पीए/१५/२०२६ नुसार राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने संबंधित महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थांमध्ये नियमित व तदर्थ (Adhoc) स्वरूपात नियुक्त केलेले आणि विद्यापीठाची मान्यता असलेले एकत्रितपणे किमान ५० टक्के अध्यापक असणे आवश्यक आहे.

याअनुषंगाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२५–२६ करिता स्थानिक निवड समिती/तासिका तत्वावर नेमणूक करण्यात येणाऱ्या अध्यापकांचे तदर्थ मान्यतेसंदर्भातील (Adhoc) प्रस्ताव आणि मान्यता पुढे सुरू ठेवण्याबाबतचे (**continuation**) प्रस्ताव Online पध्दतीने सादर करण्यास दि. ३१ मार्च, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. **अपूर्ण व अस्पष्ट प्रस्तावांवर कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही व याबाबत कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही, तसेच याबाबतीत पुढे कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही, याची संबंधित महाविद्यालय/संस्थेने नोंद घ्यावी.**

20/2/2026

(स. द. डावखर)
उपकुलसचिव
अतिरिक्त कार्यभार

जावक क्र. सीसीओ/१०७५
दिनांक – २० फेब्रुवारी, २०२६

प्रत :– मा. प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था